दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३३१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२५ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## बारावीच्या परीक्षेच्या वेळापत्रकात बदल; ५ आणि ७ मार्चचा पेपर लांबणीवर

**दै.रायगड नगरी । पुणे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या (क्ष्ठ्उ एुरा उ्रींश) वेळापत्रकात अंशत: बदल करण्यात आला आहे. ५ आणि ७ मार्च रोजी होणाऱ्या परीक्षांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.

भाषा विषयांचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. इयत्ता बारावीची परीक्षा ४ मार्च रोजी सुरू होणार आहे. पण यातील ५ मार्च रोजी होणारा पेपर आता ५ एप्रिल रोजी, तर ७ मार्च रोजी होणारा पेपर ७ एप्रिल रोजी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. काल पुणे-नगर मार्गावर पुण्याच्या दिशेने येत असताना एका ट्रकला आग लागली होती. या ट्रकमध्ये बारावीच्या प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्या होत्या. जळून खाक झालेल्या प्रश्नपत्रिका याच विषयांच्या असल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे बारावीच्या वेळापत्रकात अंशत: बदल करण्याची नामुष्की बोर्डावर आली आहे.

# महाविकास आघाडीच्या नेत्यांचा केंद्र सरकारच्या विरोधात पनवेलमध्ये निषेध



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांना सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) अटक केल्याने महाविकास आघाडीत तीव्र पडसाद उमटले आहेत. केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून सुरू असलेल्या भाजपच्या दडपशाहीविरोधात एकजुटीने संघर्ष करण्याचा निर्धार महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. त्यासाठी गुरुवारी सकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्यासमोर असलेल्या चौकात महाविकास आघाडीच्या नेत्यांसह पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारच्या दडपशाहीच्या विरोधात निदर्शने केली.

केंद्रातील तपास यंत्रणा गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील सरकार तसेच मंत्र्यांविरोधात कारवाई करण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्टच दिसत होते. त्यादृष्टीने आवश्यक पार्श्वभूमी तयार करीत नवाब मलिक यांच्या निमित्ताने केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून हा राजकीय डाव साधला गेल्याची भावना महाविकास आघाडीमध्ये आहे. तसेच अशावेळी भाजपच्या राज्यातील काही नेत्यांविरोधात गैरव्यवहार तसेच भ्रष्टाचाराचे थेट पुरावे असतानाही कचखाऊ धोरण बाळगल्याचाच हा प्रकार असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी केला आहे.

यावेळी पनवेल उरण महाविकास आघाडीच्या प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील, शिवसेनेचे पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगरप्रमुख रामदास शेवाळे, रायगड जिल्हा समन्वयक दीपक निकम, काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, काँग्रेसचे अभिजित पां. पाटील, राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, काँग्रेसचे आर. सी.घरत, हेमराज म्हात्रे, निर्मला म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, नगरसेवक गणेश कडू, शिवसेनेचे अतुल पालन, पनवेल शहरप्रमुख प्रवीण जाधव, नवीन पनवेल उपशहरप्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, पराग मोहिते, राष्ट्रवादीच्या महिला शशिकला सिंग, अमिता चौहान आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये नवाब मलिकांविरोधात भाजपचे जोरदार आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवाब मलिक यांना कोणत्याही राजकीय गुन्ह्यात अटक झालेली नाही तर मुंबई बॉम्ब स्फोटातील आरोपींशी त्यांनी जमिनीचा व्यवहार केला आहे. मलिक यांनी दिलेल्या पैशाचा वापर अंडरवर्ल्डने देशाविरुद्ध केला, अशा देशद्रोह्यांशी नवाब मलिक यांनी सौदा केलाच कसा, असा सवाल करत नवाब मलिक यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी आज पनवेलमध्ये करण्यात आली. यावेळी जोरदार घोषणा बाजी करत महाविकास आघाडीतील मंत्री घोटाळे करत सुटले आहेत, सत्तेच्या हव्यासापोटी त्यांना आणि आता नवाब मालिकांना पाठीशी घालण्याचे काम ठाकरे महाविकास आघाडी सरकार करत असल्याची घणाघाती टीका या आंदोलनातून करण्यात आली.


पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, उत्तर रत्नागिरी जिल्हा भाजपचे उपाध्यक्ष केदार साठे, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, संतोष भोईर, नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, शशिकांत शेळके, युवा नेते दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, दिनेश खानावकर, सतीश पाटील, अभिषेक भोपी, वैद्यकीय सेलचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. कृष्णा देसाई, राम पाटील, अमरीश मोकल, केदार भगत, अनेश ढवळे, भीमराव पोवार, प्रसाद हनुमंते, यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले कि, राजकीय किंवा इतर गुन्ह्यांमुळे नाही तर देशद्रोह्यांकडून जमिन खरेदी केल्यामुळे ईडीने नवाब मलिक यांना अटक केली आहे. मात्र महाविकास आघाडी त्याचे समर्थन करून आंदोलन करीत आहे. विशेष म्हणजे भ्रष्टाचारी मंत्र्यांचा राजीनामा घेतला तर त्या खुर्चीत कोण बसणार याची चिंता महाविकास आघाडी सरकारला लागली आहे म्हणूनच मलिकांचा राजीनामा घेण्यास ठाकरे सरकारने असमर्थता दाखवली आहे. आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांचा वारसा असलेला आपला राज्य आहे. मात्र आपल्या या राज्यात देशद्रोह्यांना मदत करणाऱ्यांना पाठीशी घालण्याचा निंदनीय प्रकार महविकास आघाडीकडून सुरु आहे. जमेल तेथे भ्रष्टाचार करा आणि त्यातून निवडणुक लढा हा सूत्र महाविकासाआघाडीकडून राबविला जात आहे. नितीमत्तेची जर तरी चाड असती तर नवाब मलिक यांचा राजीनामा घेतला गेला असता पण या सरकारला भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून कसे बसे सरकार चालवायचे आहे, अशी सणसणीत टीकाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. आम्ही जनतेच्या सोबत आहोत. आमचे आंदोलन भ्रष्टचाऱ्यांना अद्दल घडविण्यासाठी आहे मात्र महाविकास आघाडीचे आंदोलन पुढचा भ्रष्टाचारी मंत्री जेलमध्ये बसायला नको म्हणून सुरु आहे. अशीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठाकरे सरकारवर सडकून टीका केली.



### एमटीडीसीच्या निवास व न्याहारी उपक्रमाद्वारे

# पर्यटक सुविधांबरोबरच उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) निवास, न्याहारी तसेच महाभ्रमण योजनेच्या माध्यमातून पर्यटकांना सोयी-सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच ग्रामीण भागातील उद्योजक आणि सर्वसामान्यांना उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल, असा विश्वास पर्यटन राज्यमंत्री कुमारी आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे राज्यातील पर्यटन क्षेत्र मोठ्या प्रमाणावर बाधित झाले. आता परिस्थिती हळूहळू सुरळीत होत असल्याने एमटीडीसीमार्फत निवास व न्याहारी आणि महाभ्रमण योजनेबाबत माहिती देणारी दोन दिवसांची कार्यशाळा नुकतीच दिवेआगर येथे आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्यमंत्री कु. तटकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींसह योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेत .../२

# कर्नाळा अभयारण्य परिसरात आगीचे सत्र

**दै.रायगड नगरी । पनवेल**

निसर्ग संपदेने सुसज्ञ असलेल्या कर्नाळा अभयारण्य परिसरात मागील काही दिवसांपासून आगीचे सत्र सुरु आहे. विशेष म्हणजे या आगीमुळे मोठ्या प्रमाणात कर्नाळा किल्ला परिसरात अभयारण्यातील वन संपदा नष्ट होत असल्याचा आरोप होत आहे.

दरवर्षी वणवा लागुन अथवा समाजातील काही घटकांच्या मार्फत हि आग लावण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र कर्नाळा अभयारण्य व्यवस्थापन अथवा वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून याबाबत कोणत्याच ठोस उपाययोजना राबविल्या जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकुर यांनी केला आहे.कर्नाळा अभयारण्य परिसरातील असलेले जीव श्रृष्टीला नुकसान पोहचविण्याचा दृष्टीने होत असलेले हे प्रकार त्वरित थांबविण्याची गरज असल्याचे ठाकुर यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात अभयारण्य परिसरात मोठ्या प्रमाणात वानवा लागला होता. रात्री उशिरा पर्यंत वणवा सुरूच होता मात्र वनविभागाकडून कोणत्याच उपाययोजना राबविल्या गेल्या नाहीत.

## संक्षिप्त...

### ओबीसी आरक्षणासंदर्भातील सुप्रीम कोर्टातली सुनावणी लांबणीवर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील महाविकास आघाडी सरकारची ओबीसी आरक्षणावरची सर्वात मोठी परीक्षा २८ फेब्रुवारीला होणार आहे. ओबीसी आरक्षणासंदर्भात उद्या २५ फेब्रुवारीला होणारी सुनावणी आता सोमवारी २८ फेब्रुवारीला होणार आहे. कार्यालयीन कारणामुळे ही सुनावणी पुढे गेली आहे.

महाराष्ट्रातल्या स्थानिक निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणाचं भवितव्य ठरवणारी ही सुनावणी असणार आहे. मागासवर्ग आयोगाच्या अंतरिम रिपोर्टनुसार आरक्षण लागू करण्याची परवानगी राज्य सरकारने मागितली आहे. ओबीसी आरक्षण प्रकरणात येत्या २८ तारखेला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा होणार की नाही याचे उत्तर याच सुनावणीवर अवलंबून आहे. सर्वोच्च न्यायालयाने १७ डिसेंबर रोजी ओबीसी आरक्षणासाठीची त्रिसूत्री पार पाडल्याशिवाय राजकीय आरक्षण लागू करता येणार नाही असा आदेश दिला होता. त्यानंतर महाराष्ट्रातल्या १०५ नगर पंचायतींच्या निवडणुकाही दोन टप्प्यांत पार पाडण्याची वेळ आली होती.

### पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करधारकांना

# शास्ती आकारणी न लावणेसाठी मुदतवाढ मिळण्यासाठी महाविकास आघाडीचे निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करधारकांना शास्ती आकारणी न लावणेसाठी मुदतवाढ मिळण्यासाठी शेकापने पनवेल पालिका आयुकत याना निवेदन दिले आहे.



यावेळी आमदार बाळाराम पाटिल, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडु, सतीश मोहन पाटील, अरविंद म्हात्रे, गोपाळ भगत, विष्णू जोशी, सखाराम पाटील, विजय खानावकर, रवींद्र भगत, ज्ञानेश्वर पाटील, डॉक्टर सुरेखा मोहोकर, कमल कदम, प्रज्योती म्हात्रे, भारती चौधरी, मंजुळा कातकरी, अरुणा दाभणे, प्रीती जॉर्ज, प्रिया भोईर, उज्वला पाटील, सारिका भगत .../२

> कर आकारणी करणेसाठी पुढील एक वर्षांची मुदत वाढ दिली नाही तर पालिका क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर तीव्र आंदोलन करण्यात येईल.
> **-प्रितम म्हात्रे, विरोधी पक्ष नेते**

> सध्या कोरोनाचा काळ आहे. त्यामुळे नागरिक हतबल झालेली आहेत. त्यातच पालिकेने नागरिकांच्या माथी कराचा बोजा मारला आहे. हे नागरिकाना पसंत नाही याच्या विरोधात नागरिकांच्या मनात प्रचंड रोष आहे. मालमत्ता करात भरपूर त्रुटी आहेत. कर वाढ कमी होऊन कर धारकांना कोणतीही शास्ती/दंड / व्याज आकारणी करू नये व कर आकारणी करणेसाठी पुढील एक वर्षांची द्यावी.
> **-सतीश पाटील, नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेस**

# कर्नाटकमधील विद्यार्थ्यांच्या हत्येचा बजरंग दलाकडून निषेध

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्नाटकात समान गणवेशासाठी भगव्या शालेचे आंदोलन उभे करणारे बजरंग दलाचे कार्यकर्ते २६ वर्षीय हर्षा यांची कर्नाटकातील शिमोगा शहरात जिहादी विचारधारेचे लोकांकडून चाकू भोसकून क्रूर हत्या करण्यात आली होती.या हत्येचा निषेध कर्जत येथे बजरंग दल यांच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

कै. हर्षा यांनी कर्नाटकात समान गणवेशासाठी भगव्या शालेचे मोठे आंदोलन उभे केले होते.त्यात हजारोनी युवकांनी भाग घेतला होता आणि त्यामुळे त्याची दिवसाढवळ्या भर रस्त्यात क्रूरपणे हत्या केली होती.या हत्येचा निषधार्थ कर्जत येथे बजरंग दल यांच्याकडून निदर्शने करण्यात आली.बजरंग दलाने कर्जत येथील तहसिल कार्यालयात जाऊन तहसीलदार विक्रम देशमुख यांना निवेदन सादर केले. यावेळी जिल्हा बजरंग दल संयोजक साईनाथ श्रीखंडे, प्रखंड मंत्री विशाल जोशी, अध्यक्ष विनायक उपाध्ये, धर्मप्रसार प्रमुख दिनेश रणदिवे, अनंत हजारे, सचिन ठाकूर, रमेश नाईक, गायत्री परांजपे, दिनेश कडू, संदेश कालभोर, मनोज लाड आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाणजे पाणथळीच्या सीआरझेड दर्जावर एनजीटीचा शिक्कामोर्तब ; सिडको, एनएमएसईझेड हरकत ठरवली रद्दबादल

## पाणथळ क्षेत्र म्हणून संवर्धित करण्याचे राज्याला निर्देश

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील पाणजे पाणथळ क्षेत्राचा बचाव करण्यात पर्यावरणप्रेमींना मोठा विजय मिळाला असून हे क्षेत्र सीआरझेड १ अंतर्गत येत असल्याचा निर्वाळा राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (एनजीटी)ने देत सिडको आणि एनएमएसईझेडच्या वतीने क्षेत्राच्या दर्जाबाबत घेतलेली हरकत रद्दबादल ठरवली आहे.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पश्चिम क्षेत्र खंडपीठाचे प्रमुख न्यायमूर्ती आदर्श कुमार गोयल यांनी १५ एप्रिल २०२१ रोजी न्यायाधिकरणाचा निर्णय (२०२० दरम्यान पाणथळ क्षेत्राचे बुजविण्यात आलेले अंतर्गत जल स्त्रोत खुले करण्यात यावेत) विरुद्ध सिडको आणि एनएमएसईझेडने दाखल केलेल्या याचिकांची पुनर्पडताळणी करत ती रद्दबादल ठरवली. खंडपीठाच्या अन्य सदस्यांत न्यायमूर्ती ब्रिजेश सेठी आणि तज्ज्ञ सदस्य नागिन नंदा, डॉ ए सेंथिल वेल, डॉ विजय कुलकर्णी आणि डॉ अफरोज अहमद यांचा समावेश आहे.

२०२० दरम्यान पाणथळ क्षेत्रात प्रवाहित होणारे भरतीच्या पाण्याचे बुजवण्यात आलेले मार्ग खुले करण्यात यावेत असे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिले. वास्तविक न्यायाधिकरणाने सिडको आणि रायगड जिल्हाधिकाऱ्यांना ११ नोव्हेंबर २०२० रोजी काढण्यात आलेल्या आदेशांचे पालन करत बुजवलेले मार्ग मोकळे करण्याचे निर्देश दिले आहेत. पाणजे क्षेत्राचा २८९ हेक्टर परिसर कृषी क्षेत्र असून ही जमीन विकसीत करता येईल. असे सिडको आणि एनएमएसईझेडचे म्हणणे होते. या क्षेत्रात असलेला जलाशय पूरस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी असून समुद्राच्या प्रवाहाशी त्याचा संबंध नसल्याचे सिडकोचे म्हणणे होते. तसेच पुराचे पाणी नियंत्रित करण्याच्या उद्देशाने डच पद्धतीतंर्गत झडपवजा दरवाज्यांचा प्रवेश वादाचा मुद्दा ठरला होता. या दरवाज्यांचा प्रवेश मार्ग गावात पूरस्थिती निर्माण करणारा ठरेल असा दावा सिडको आणि एनएमएसईझेडच्या वतीने करण्यात आला. या क्षेत्रात कांदळवने असल्याने पाणजेला पाणथळ क्षेत्र घोषित करता येणार नाही हा वाद उपस्थित करण्यात आला.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने बुधवारी याचिकांची पुनर्पडताळणी करत सीआरझेड १ च्या दर्जाविषयीचे सर्व वाद .../२



# बोकडविरा ग्रामस्थांच्या मागण्या बाबत सिडको प्रशासनाची सकारात्मक भूमिका



**दै.रायगड नगरी । उरण**

बोकडविरा ग्रामस्थांनी आपल्या विविध मागण्यांसाठी दि.२५/०१/२०२२ पासून सिडको व रेल्वे संबंधित बोकडविरा महसूल हद्दीतील सर्व कामे ग्रामस्थांतर्फे बंद करून कामबंद आंदोलन केले होते. या कामबंद आंदोलनाची दखल घेऊन बुधवार दि.२३/०२/२०२२ रोजी सिडको भवन, सी बी डी बेलापूर येथे सिडको चे सह.व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे,रेल्वेचे चीफ इंजिनिअर एच. एस.चतुर्वेदी व बोकडवीरा ग्रामस्थांचे प्रतिनिधी मंडळ यांच्या मध्ये बैठक संपन्न होऊन या बैठकी मध्ये झालेल्या चर्चेचे मिनिट्स आठवडा भरात लेखी स्वरूपात देण्यात येणार असल्याची माहिती सरपंच मानसी पाटील यांनी दिली आहे.

तसेच बोकडवीरा गाव शेजारी होऊ घातलेल्या रेल्वे स्टेशनच्या आराखडा मध्ये येत असलेली नऊ घरे हि बाधित होणार नाहीत.गावा शेजारी होऊ घातलेल्या रेल्व स्टेशन ला बोकडवीरा रेल्वे स्टेशन नाव देण्यासंदर्भात ताबडतोब प्रस्ताव पाठवण्यात येईल. बोकडवीरा गावातील शेतकऱ्यांना विकसित १२.५% भूखंड वाटप यांच्या १५७ फाईल आहेत. त्यातील ६० फाईल ड्रॉ साठी आहेत. उर्वरित फाईल ची पूर्तता करण्यासाठी ग्रामपंचायत सोबत पत्रव्यवहार केला जाईल. ज्या ग्रामस्थांची जमीन रेल्वे स्टेशन साठी गेली आहे त्यांना रेल्व प्रकल्पग्रस्ताचा दाखला देण्या सबंधी कार्यवाही केली जाईल. गावातील ग्रामस्थांनी गरजे पोटीं बांधलेली घरे शासन निर्देशानुसार नियमित करण्यात येतील. गावात येणार समुद्राच्या भरती/ओहोटी च पाणी याच्यावर पाहणी करून काही दिवसात निर्णय घेतला जाईल. झालेल्या निर्णयांवर कारवाई संबंधी आढावा बैठक घेतली जाईल.असे सिडको प्रशासनातर्फे उपस्थितांना कळविण्यात आले आहे.

या मिटिंगसाठी बोकडविरा ग्रामस्थांतर्फे सरपंच मानसी देवेंद्र पाटील, ग्रा.सु.मंडळ अध्यक्ष सूर्यकांत ल.पाटील, जेएनपीटीचे ट्रस्टी कॉ. भूषण पाटील, कायदेतज्ज्ञ ॲड.विजय पाटील, उरण उत्कर्ष समिती अध्यक्ष गोपाळ पाटील, उपसरपंच शेखर भा.पाटील, ग्रा.पं. सदस्य राकेश व.पाटील, कल्पेश वि.पाटील, वंदना दि.पाटील,निर्मला दि.पाटील, माजी सरपंच भगवान ग. पाटील. गणपती देवस्थान ट्रस्टी विरेंद्र ना. पाटील, ग्रा.सु.मं. कार्याध्यक्ष श्रीकांत चं.पाटील, माजी सेक्रेटरी सुनील रा.पाटील, जेष्ठ नागरिक गजानन श. पाटील, सुर्यकांत ज.पाटील, प्रकाश ज. पाटील, मयुरेश का.पाटील, तसेच सह पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण सुनील पाटील तसेच सिडको व रेल्वेचे संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# जेएनपीटी कंटेनर टर्मिनलचे काम चार दिवस ठप्प

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलवर सायबर हल्ला झाल्याने जेएनपीटी कंटेनर टर्मिनलचे कामकाज गेली चार दिवस विस्कळीत झाले आहे. एकंदरीत केंद्र सरकारच्या एकमेव मालकीच्या राहिलेल्या जेएनपीटी कंटेनर टर्मिनलवर सायबर हल्ला झाल्याने कंटेनरच्या हाताळणीच्या कामाला ब्रेक लागला आहे. त्यामुळे परदेशातील जहाजे समुद्रातच लटकल्याने जेएनपीटी बंदराचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असल्याने या घटनेची सखोल चौकशी करावी अशी मागणी कामगार वर्ग व्यक्त करत आहेत.

नवीमुंबई , मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या उरण तालुक्यातील जेएनपीटीने न्हावा शेवा इंटरनॅशनल कंटेनर टर्मिनल, गेट वे टर्मिनल्स इंडिया, न्हावा शेवा इंटरनॅशनल गेट वे टर्मिनल आणि नव्याने सुरू करण्यात आलेले भारत मुंबई कंटेनर टर्मिनल्स आदि चार टर्मिनल्सचे या अगोदर खाजगीकरण करण्यात आले आहे. जेएनपीटीच्या मालकीच्या उरलेल्या एकमेव कंटेनर टर्मिनलचेही खाजगीकरण करण्याची प्रक्रिया केंद्र सरकारच्या नौकानयन खात्याने सुरू केली आहे. सरकारच्या एकमेव मालकीच्या उरलेल्या जेएनपीटीच्या याच टर्मिनलवर सायबर हल्ला झाला आहे. यामुळे जेएनपीटीव्दारे संचालित कंटेनर टर्मिनल वरील आयटी यंत्रणा विस्कळीत झाली आहे. हल्ला इतका गंभीर आहे की सर्व स्वयंचलित ऑपरेशन्स ठप्प पडले आहे. संगणक बंद झाल्याने टर्मिनल वरील कर्मचाऱ्यांना कागद आणि पेन घेऊन काम करण्याची वेळ आली आहे.

एकंदरीत जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनल वरील सायबर हल्ल्यामुळे जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनल मधील अनेक जहाजे समुद्रातच लटकली आहेत. जेएनपीटीची स्वयंचलित यंत्रणा मागील चार दिवस ठप्प झाल्याने जेएनपीटी परिसरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. त्याचा फटका हा प्रवाशी वाहनांना बसत आहे. सध्या जेएनपीटी बंदराच्या प्रशासनाने आपल्या बंदरातील काम काज इतर खाजगी बंदरातून सुरू केला असल्याची माहिती कामगार वर्गाकडून मिळत आहे. आज अशा सायबर हल्ल्यामुळे जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलचे करोडो रुपयांचे नुकसान झाले आहे. परंतु इतर खाजगी कंटेनर टर्मिनलवर सायबर हल्ल्या न होताच सरकारच्या एकमेव मालकीच्या उरलेल्या जेएनपीटी बंदरावर सायबर हल्ल्या झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. तरी या घटनेची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी कामगार वर्ग करत आहेत.


मा.पांडे सो. यांचे कोर्टात

ॲड.श्री.स्वप्नेश सं. घरत
अर्जदार तर्फे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.२१२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०३/२०२२

श्री.अब्दुल रहेमान शेख अली शेख
वय : ७२ वर्षे, धंदा : शेती
रा.घर क्र.२८९, शिवकर, विठ्ठल मंदिराजवळ,
पो.ओ.एन.जी.सी., ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

सर्व लोकांस जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार श्री.अब्दुल रहेमान शेख अली शेख यांचा जन्म दि.०५/१२/१९५० रोजी मौजे : शिकवर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद संबंधित ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल यांच्या कार्यालयामध्ये करण्याचे अनावधानाने राहून गेले होते.

त्याअर्थी अर्जदार हिच्या जन्माची नोंद होवून, तसा जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याकरिता पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हिच्या जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याबाबत केलेल्या अर्जास कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांचे वकीलांमार्फत त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मा.कोर्टात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांच्या अर्जावर पुरावा घेवून, अर्जदार हिस जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश पारित करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२३ माहे फेब्रुवारी २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.पांडे सो. यांचे कोर्टात

ॲड.श्री.स्वप्नेश सं. घरत
अर्जदार तर्फे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.२३५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२३/०३/२०२२

शरीफा सुलेमान शेख
पुर्वाश्रमीची शरीफा आदम तेली
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.१९२, इमान हुसेन चौक, मस्जिद जवळ,
घोडबंदर रोड, कासार वडवली, जि.ठाणे अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार शरीफा सुलेमान शेख पुर्वाश्रमीची शरीफा आदम तेली हिचा जन्म दि.०१/०१/१९५४ रोजी मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला असून तिच्या जन्माची नोंद संबंधित ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल यांच्या कार्यालयामध्ये करण्याचे अनावधानाने राहून गेले होते.

त्याअर्थी अर्जदार हिच्या जन्माची नोंद होवून, तसा जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याकरिता पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हिच्या जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याबाबत केलेल्या अर्जास कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांचे वकीलांमार्फत त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मा.कोर्टात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांच्या अर्जावर पुरावा घेवून, अर्जदार हिस जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश पारित करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२३ माहे फेब्रुवारी २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.सोनवणे साहेब

ॲड.सुनील एन. मोरे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१२४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०३/२०२२

सौ.रचना रवींद्र ब्रीद
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.फ्लॅट नं.१०३, धारा होम्स, प्लॉट नं.२९,
सेक्टर-२२, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा कै.अनिकेत रवींद्र ब्रीद हा दि.०४/०५/२०१९ रोजी, एनवायके आयसाबेल शिप, डब्ल्यू-१, अनकोरींग बेसीन ऑफ पुसन न्युपोर्ट, गंगेस-गु, बुसन, रिपब्लिक ऑफ कोरीया येथे मयत झाला आहे. कै.अनिकेत रवींद्र ब्रीद यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकती या सिडकोच्या अधिकार क्षेत्रात आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील, फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, प्लॉट नं.२९, धारा होम्स, सेक्टर-२२, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदाार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२४/२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# माथेरान रेल्वे तिकीट तपासणीस आर. आर. चौधरी सेवानिवृत्त



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नॅरोगेज ट्रेनचे रेल्वे तिकीट तपासणीस आर. आर. चौधरी नुकताच सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा छोटेखानी सत्कार समारंभ येथील कॉटेज काचवाला याठिकाणी मोठया थाटात संपन्न झाला. अनेक वर्षांपासून त्यांनी माथेरान रेल्वे स्थानक मध्ये अत्यंत इमानेइतबारे कर्तव्य पार पाडले आहे. इथल्या सर्वांशी त्यांचे हितसंबंध प्रेमाचे असल्याने त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. माथेरान मधील अनेक कार्यक्रमात त्यांचा नेहमीच सहभाग होता. या गावचे ते रहिवासी असल्याप्रमाणे सर्वांशी अगदी आपुलकी आणि प्रेमाने वावरत होते. अनेकदा स्टेशन मध्ये ऐन गर्दीच्या वेळी स्थानिकांना नेहमीच सहकार्याची भूमिका पार पाडली आहे. आर. आर. चौधरी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या सत्कार समारंभ वेळी अनेक मान्यवरांनी त्याचप्रमाणे त्यांच्या सोबत कार्यरत असणाऱ्या रेल्वेच्या अधिकारी, कामगार वर्गाने त्यांचा शाल श्रीफळ तसेच भेटवस्तू देऊन सत्कार केला यावेळी माजी नगराध्यक्ष अजय सावंत, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे यांसह चौधरी यांच्याशी संबंधित असलेल्या अनेकांनी यावेळी आपली उपस्थिती दर्शवली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पर्यटक सुविधांबरोबरच उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल : ना.आदिती तटकरे

एमटीडीसीचे महाव्यवस्थापक दिनेश कांबळे यांनी योजनेच्या सादरीकरणाद्वारे पर्यटन संकल्पनांच्या व्यावसायिक संधी, शासकीय योजनांचे स्वरूप यांची माहिती देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण दिले.

राज्यमंत्री कु.तटकरे म्हणाल्या, रायगड जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. एमटीडीसीच्या विविध योजनांचा उद्योजकांनी येथे नक्कीच लाभ घ्यावा. महामंडळाने या योजनेत अधिकृतरित्या नोंदणीसाठी काही अटी शर्ती आखल्या असून नोंदणी केल्यानंतर पर्यटकांना काय सुविधा द्याव्या, पर्यटकांच्या निवासासाठी काय कार्यपद्धती असावी याचे मार्गदर्शन करण्यात येते. ग्रामीण भागातील पर्यटनाच्या व्यावसायिक संधीबाबत तरुणवर्ग जागरूक होत आहे ही एक सकारात्मक बाब असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी निवास व न्याहारी योजनेंतर्गत नोंदणी केलेल्या व्यावसायिकांना राज्यमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नोंदणी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. एमटीडीसीच्या निवास व न्याहारी तसेच महाभ्रमण योजनांना आजवर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून पर्यटन क्षेत्रात या उपक्रमांचे महत्व सिद्ध झाले आहे. ग्रामीण भागातील उद्योजकांना तसेच सामान्य जनतेला उत्पन्नाचा स्रोत म्हणून निवास व न्याहारी योजनेअंतर्गत नोंदणी करून आपली जागा, कक्ष किंवा निवास व्यवस्था पर्यटकांसाठी विविध सांस्कृतिक अनुभवांसह परवडणाऱ्या दरात प्रदान करता येते. अधिकाधिक लोकांपर्यंत या योजनांची माहिती पोहोचवली जावी या उद्देशाने या कार्यशाळेत सहभागी झालेल्या इच्छुकांना या योजनांचे स्वरूप व त्याबाबतची माहिती दिली गेली.

## शास्ती आकारणी न लावणेसाठी मुदतवाढ मिळण्यासाठी महाविकास आघाडीचे निवेदन

उपस्थित होते. पनवेल महानगरपालिका प्रशासनाने वृत्तपत्रात जाहिरातीत दिलेल्या माहितीनुसार नागरिकांना ३१ मार्च २०२२ पर्यंतच्या मुदतीत कर भरण्याचे आव्हान केले आहे. १ एप्रिल २०२२ पासून २ टक्के दरमहा शास्ती कर आकारून व्याज घेणार असल्याचे नमुद केले आहे. पनवेल महानगरपालिकेने दिनांक १२ मे २०२१ रोजी कार्यालय जा.क. ३१२१/प्र.क. १/१५५५/२१ सुधारित ओदश पान क. ५/६ वर नमुद केले आहे की, दिनांक १ एप्रिल २०२१ ते दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत सदर कालावधीमध्ये कोणतीही शास्ती / दंड / व्याज आकारण्यात येवू नये असे आदेश आयुक्त सुधाकर देशमुख यांनी काढले होते. त्यानंतर आयुक्त गणेश देशमुख यानी पदग्रहण केल्यानंतर शुध्दीपत्रकाद्वारे सदर मुदत ही ३१ मार्च २०२२ पर्यंतची केली आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराबाबत नागरीकांच्या मनात प्रचंड रोष आहे. अशातच दोन वर्षे असलेली कोवीड परिस्थीती पाहता सदर आपण लावत असलेली शास्तीही अन्यायकारक आहे.

मालमत्ता कर धारकांना कोणतीही शास्ती/दंड / व्याज आकारणी करू नये व कर आकारणी करणेसाठी पुढील एक वर्षांची म्हणजे ३१ मार्च २०२३ ही मुदत वाढ देण्याबाबतचे आदेश आपण काढावेत. अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यानी केली आहे.

## पाणजे पाणथळीच्या सीआरझेड दर्जावर एनजीटीचा शिक्कामोर्तब

रद्दबादल ठरवत या दर्जावर शिक्कामोर्तब केला, व या क्षेत्राच्या संवर्धनाला दुजोरा दिला. भरतीच्या प्रवाहात कोणीही हस्तक्षेप करू नये असे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचे म्हणणे आहे, अशी माहिती पवार यांच्या वतीने युक्तिवाद करणा-या ॲडव्होकेट मिनाझ काकलीया यांनी दिली.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय ही पर्यावरणाच्या दृष्टीने जमेची बाजू असल्याचे श्री एकविरा आई प्रतिष्ठान (एसईएपी) आणि नाटकनेक्ट फाऊंडेशनचे मत आहे. पांजे क्षेत्र त्वरीत संवर्धित क्षेत्र म्हणून घोषित करावे अशी विनंती या दोन्ही संस्थांनी राज्य शासनाकडे केली. बेलपाडा, भेंडखळ, एनआरआय आणि टीएस चाणक्य तसेच भांडुप या पाचही पाणथळ क्षेत्रासह समवेत पाणथळीची देखभाल करण्यात स्वारस्य असल्याचे अगोदरच राज्य कांदळवन कक्षाने स्पष्ट केले आहे. त्याशिवाय स्पेस ॲप्लिकेशन सेंटर (एसएसी) द्वारे राष्ट्रीय पाणथळ-भूमी दशक बदल अहवाल (छ्रींळेपरश्र थशींश्ररपव उ्शलरवरश्र उहरपसश -र्ीेंश्री) तयार करण्यात आला. ज्यामध्ये अंतर्गत भरतीचा प्रवाह, कांदळवने आणि दलदलीचे प्रदेश असलेले पांजे हे पाणथळ क्षेत्र असल्याचे केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान नियंत्रण मंत्रालय (एमओईएफसीसी)ने स्पष्ट केल्याचे नाटकनेक्टचे संचालक बी एन कुमार यांनी सांगितले. फेब्रुवारी २०१९ दरम्यान एनएमएसईझेड डी-नोटीफाय झाल्याविषयी तसेच अनधिकृतपणे सुपूर्द करण्यात आलेल्या पाणजे क्षेत्रावर ताबा मिळवता येणार नसल्याचे नाटकनेक्टने मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून कळवले आहे. या प्रकरणात लक्ष घालण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी अगोदरच पर्यावरण विभागाला दिलेले आहेत.

पर्यावरण संचलनालयाने ११ नोव्हेंबर २०२० रोजी आदेश काढूनही त्याची अंमलबजावणी न करता, पांजेचे बुजविण्यात आलेले मार्ग मोकळे करण्यात हयगय झाल्याने मागच्या वर्षी एप्रिल महिन्यात श्री एकविरा आई प्रतिष्ठान राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे न्याय मागण्यासाठी गेली होती. पाणजे क्षेत्रात भरतीच्या पाण्याला अटकाव करत पाच जलमार्ग बुजविण्यात गेल्याच्या तक्रारी नाटकनेक्ट फाऊंडेशन आणि श्री एकविरा आई प्रतिष्ठानच्या वतीने पर्यावरण संचालक नरेंद्र टोके यांच्याकडे नोंदवण्यात आल्या. हे बुजविण्यात आलेले मार्ग मोकळे करण्याचे आदेश आले. टोके यांनी निर्देश दिली की, पाणजे पाणथळ क्षेत्र सीआरझेड १ अंतर्गत येते आणि भरतीचा प्रवाह रोखणे अयोग्य आहे. त्यामुळे बुजवलेले मार्ग खुले करावेत. तसेच एनएमएसईझेडने या परिसरात उभारलेली सुरक्षा केबिन हटविण्याचे निर्देश देण्यात आले. हे बुजवण्यात आलेले प्रवाह तसेच खाडीला जोडलेले सांडव खुले केल्यास फुंदे, द्रोणगिरी आणि बोकडविरा त्याचप्रमाणे एनएमएसईझेडच्या पाणजे क्षेत्रात पूरस्थिती निर्माण होऊ शकते असा दावा सिडकोने राष्ट्रीय हरित न्यायाधिकारणाकडे केलेल्या अतिरिक्त याचिकेत केला.मात्र राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सर्व युक्तिवाद फेटाळून लावत पाणजेच्या सीआरझेड १ दर्जावर शिक्कामोर्तब केला आहे.जर सिडकोच्या वतीने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या निर्णयाला आव्हान देण्यात आल्यास आपल्याला सूचना न देता आदेश पारीत करू नये याकरिता पवार अगोदरच सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करणार आहेत.


**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.संजय कटेकर, कार्यकारी अभियंता (प्रकल्प), बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | ०१ बदाम, ०१ नारळ, ०१ बेल व ०२ जंगली अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब', प्र.क्र.९ खिडूकपाडा गावामध्ये पावसाळी गटाराचे बांधकाम करणे. सदर सुशोभिकरण करण्याच्या कामामध्ये विविध प्रकारची ०५ झाडे बाधित होत आहे. त्याचा तपशिल सोबत जोडले आहे. ते बाधित होणारी झाडे तोडण्याशिवाय गटाराचे काम करता येणे शक्य नाही. त्यामुळे ती झाडे तोडण्याचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरण विभागाकडे पाठविणेस व त्याची मान्यता घेवून ती झाडे तोडण्याची कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेबाबत. |
| २ | श्री.संजय कटेकर, कार्यकारी अभियंता (प्रकल्प), बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | ०१ उंबर झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०२ मधील पडघे गावामध्ये पावसाळी गटाराचे बांधकाम करणे. पडघे गावातील मुख्य रस्ता काँक्रीटीकरण करणे, पडघे गावामध्ये मुख्य नाल्याचे पाईप ड्रेन काढून मोठा नाला बांधणे, रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे व नदीवरील जुना पुल तोडणे. सदर कामामध्ये ०५ झाडे बाधित होत आहेत. त्याचा तपशिल सोबत जोडला आहे. ती बाधित होणारी झाडे तोडण्याशिवाय (Retainning Wall) काम करता येणे शक्य नाही. त्यामुळे ती झाडे तोडण्याचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरण विभागाकडे पाठविण्यास व त्याची मान्यता घेवून ती झाडे तोडण्याची कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेबाबत. |
| ३ | जीसी वेन्चर्स लि., २०९-२१०, अर्केडीया बिल्डींग, दुसरा मजला, १९५, नरीमन पॉईंट, मुंबई ४०००२१ | ०१ शेवगा, ०३ खैर, ०१ कडुलिंब, ०१ उंबर, ०२ बहावा, ०३ विलायती चिंच व ०१ बदाम अशी एकूण १२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील आम्ही ग्रीन्स वेन्चस लि. प्लॉट क्रमांक १A+१B+१C+१D, सेक्टर-२७, खारघर, नवी मुंबई येथे भूखंड आहे. आम्ही तुम्हाला कळवू इच्छितो की, आमच्या प्लॉटमध्ये आणि आमच्या प्लॉटच्या समोरील बाजूस काही झाडे आहेत ती आम्ही नजिकच्या भविष्यात आमच्या प्लॉटचा विकास करण्यासाठी कट करू इच्छितो. त्या संदर्भात, आम्हाला तुमच्या विभागाची आवश्यक परवानगी मिळणेबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र.१५/९५/२०२२
दिनांक : २४/०२/२०२२

''महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे मार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दि.१२ मार्च, २०२२ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे नियोजन केले आहे.''


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## खरसईमध्ये मोफत नेत्रचिकित्सा शिबिर व स्वच्छता अभियान



**दै.रायगड नगरी । दिघी**

संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या जन्मदिनी म्हसळा तालुक्यातील खरसई येथील सत्संग भवन मध्ये बुधवारी, ता. २३ रोजी मोफत नेत्रचिकित्सा शिबिर पार पडले. एकूण १०० नागरिकांच्या डोळयांची तपासणी म्हसळा ग्रामीण रुग्णालयाच्या नेत्रचिकित्सक नलिनी जाधव यांनी रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी केली.

यावेळी रायगड झोन चे प्रमुख प्रकाश म्हात्रे, सेवादल अधिकारी तुकाराम मांदाडकर, शशिकांत म्हात्रे, सहदेव म्हात्रे इतर मान्यवर उपस्थित होते. झोनल इंचार्ज प्रकाश म्हात्रे यांनी सांगितले की, भारत देशात मिशनच्या वतीने १६ राज्यात ६१ मोफत नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यांत आले आहे. या व्यतिरिक्त कोरोनाच्या कालखंडात जेव्हा भारतभर इस्पितळांमध्ये ऑक्सीजनचा तुटवडा निर्माण झाला होता तेव्हा मिशनच्या वतीने वननेस वन परियोजने अंर्तगत २१ ऑगस्ट, २०२१ रोजी संपूर्ण भारतात जवळपास ३५० ठिकाणी दिड लाखाच्या आसपास वृक्ष लागवड करण्यात आली. त्याचबरोबर त्यांची देखभाल करण्यासाठी तीन वर्षे दत्तक घेऊन त्यांचे पालनपोषण करण्याचाही संकल्प करण्यात आला. ते पुढे म्हणाले की, सतगुरु बाबाजींच्या जन्मदिनी मिशन मार्फत २००३ पासूनच स्वच्छता आणि वृक्षारोपण अभियान सुरु करण्यात आले असून ते सातत्याने पुढे नेले जात आहे. मानव कल्याणाचा त्यांचा दृष्टिकोन हाच होता, की प्रदूषण आतील असो अथवा बाहेरील दोन्ही हानीकारक आहेत. तथापि, यावर्षी कोरोनाची विषम परिस्थिती लक्षात घेऊन मिशनच्या वतीने केवळ जिथे सत्संग भवन आहेत तिथे आणि आजुबाजुच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले असे त्यांनी सांगितले.



### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## म्हसळा शहर दिघी नाका ते तोंडसुरे पर्यायी मार्गासाठी २ कोटी ६५ लक्ष रुपयांची मंजुरी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पर्यटन विकासाचे दृष्टीने म्हसळा शहर हे हरिहरेश्वर, श्रीवर्धन आणि दिवेआगराचे स्वागत कमान आहे. पर्यटनाला येणाऱ्या जाणाऱ्या पर्यटकांना प्रथम निसर्ग सौंदर्याने नटलेल्या म्हसळा तालुक्याचे दर्शन मिळते. येथील पर्यटनाला अधिक चालना मिळण्यासाठी खासदार सुनिल तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांचे विशेष प्रयत्नाने राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून म्हसळा तालुका झपाट्याने विकसित होत आहे. खासदार सुनिल तटकरे यांनी म्हसळा शहरातील मुख्य नादुरुस्त रस्ता विकसित करण्यासाठी राज्य शासनाचे बजेट अंतर्गत (अर्थसंकल्प निधींतुन) एकुण २ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.



रस्ता बांधकाम करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. या मध्ये प्रामुख्याने म्हसळा न्यु इंग्लिश स्कूल ते दिघी नाका पर्यंतच्या ६०० मीटर रस्ता बांधकामाला १ कोटी ३० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून हे बांधकाम काँक्रीटीकरणाचे आहे तर दिघी नाका ते तोंडसुरे बायपास्ट पर्यंतच्या २.१०० मीटरच्या रस्ता बांधकामासाठी १ कोटी ३५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे काम डांबरीकरणाचे असल्याचे सार्वजनिक बांधकाम सहा.अभियंता जेट्टे यांनी माहिती देताना सांगितले. रस्त्याच्या बाजूने १०० मीटर अंतराचा सांडपाणी वाहून नेण्यासाठी बांधकाम करण्यात येणार आहे. रस्ता बांधकामाचा ठेका साई सिद्दी कंट्रक्शनने घेतला असल्याचे समजते. म्हसळा शहरातील नागरी वाहतुकीच्या रस्त्यावरून दिघी पोर्ट, दास ऑफशर्स कंपनीकडे मालवाहतूक करणारे अवजड वाहनांची वर्दळ असल्याने नव्याने करण्यात येणाऱ्या रस्त्याचा बांधकामाचा दर्जा चांगला करण्यात यावा अशी मागणी माजी सभापती महादेव पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी वर्गाकडे केली आहे. म्हसळा शहरातील पर्यायी मार्गालाच दिघी पुणे राज्य मार्ग ९७, श्रीवर्धन गोरेगाव राज्य मार्ग ९८ जोडलेले आहेत. म्हसळा तालुक्यात गाव शहर अंतर्गत रस्ते, लहान मोठे साकव, पुलाचे नव्याने स्ट्रक्चरल ऑडीट होऊन त्यांचे बांधकाम सुरू आहे. खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे या कामी जास्तीत जास्त प्रयत्नशील दिसत आहेत त्यामुळे म्हसळा शहरात व शहरालगत रस्ते विकासाला चालना मिळाली आहे. म्हसळा न्यु इंग्लिश स्कूल, दिघी नाका ते सकलप तोंडसुरे गावापर्यंत जाणारा शहर अंतर्गत रस्ता बांधकाम करण्यासाठी खासदार सुनिल तटकरे यांनी प्राधान्याने मंजुरी मिळवुन दिली आहे. सदरचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीवर्धन यांचे देखरेखीखाली करण्यात येणार आहे. रस्ते बांधकाम बाबतीत शासन मान्यता मिळून सर्व त्या बाबींचा पाठपुरावा केला असल्याचे सांगण्यात आले आहे. नव्याने करण्यात येणाऱ्या रस्ता काँक्रीटीकरण व डांबरीकरणाचे काम दर्जेदार करण्यात यावे अशी मागणी माजी सभापती महादेव पाटील यांनी केली आहे.

## नबाब मलिकांचा भा.ज.पा.तर्फे जाहीर निषेध ; तहसीलदारांना निवेदन



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नबाब मलिक यांच्यावर मनी लाँड्रिंग प्रकरणी ईडी मार्फत झालेल्या कारवाई बाबत व देशविघातक शक्तींशी असलेल्या घनिष्ठ संबंधांबाबत आज मुरुडमध्ये जाहीर निषेध करण्यात येऊन सरकारने त्यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा. याबाबतचे एक निवेदन भारतीय जनता पार्टी तर्फे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तहसीलदार रोहन शिंदे यांना देण्यात आले.यावेळी नबाब मलिक व सरकार विरोधी घोषणा देण्यात आल्या.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, देशविघातक शक्तींशी संबंध असलेल्या नबाब मलिक यांचा आम्ही निषेध व्यक्त करत असून मुंबई बॉम्बस्फोट कटातील देशद्रोही आरोपींकडून करोडोंची जमीन कवडीमोल दराने खरेदी करून देशविघातक कारवाई करणा–यांसोबत घनिष्ठ संबंध असणाऱ्या नबाब मलिक यांचा जाहीर निषेध व्यक्त करीत असून त्यांचा महाराष्ट्र सरकारने अल्पसंख्याक मंत्री पदाचा तात्काळ राजीनाम्याची कारवाई करण्यात यावी. अशी मागणी भा.ज.पा.तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, शहर अध्यक्ष उमेश माळी, ज्येष्ठ नेते जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे, बाळा भगत, नरेश वारगे, परेश किल्लेकर, जगदीश पाटील, अभिजित पानवलकर, राजेंद्र सुतार यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## चिरनेर येथील कोरड्या विहीरीत पडलेल्या नवजात वासरास जिवनदान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर रांजणपाडा येथील युवकांनी ३० फूट कोरड्या विहरीत पडलेल्या ८ ते १० दिवसांच्या गाईच्या वासरास जिवनदान दिले. दि.२३ फेब्रुवारीच्या रात्री सुमारे ११ ते बुधवार दि.२४ च्या पहाटे १ वाजे पर्यंत हे बचावकार्य चालू होते. रात्रीचा अधार व ३० फूट कोरडी विहीर असे असतांनाही आपल्या जीवाची पर्वा न करता जिगरबाज कामगिरी करणाऱ्या या युवकांचे सर्व स्तरातुन कौतूक होत आहे.

याबाबत सह्याद्री प्रतिष्ठाणचे अलंकार ठाकूर यांनी दिलेल्या माहीतीनुसार, चिरनेर–रांजणपाड्यातील युवकांना मंगळवार दि.२३ फेब्रुवारी च्या रात्री सुमारे ११ च्या दरम्यान माहिती मिळाली की गावाच्या बाहेर डोंगराळ भागातील एका शेतात असलेल्या विहिरीत गाईचा एक वासरू पडला आहे. रात्रीची वेळ असूनही केवळ त्या वासराला वाचवणे हा एकच विचार करुन त्या युवकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. जाताना समय सूचकता दाखवत त्यांनी २ मोठे दोर व त्या वासरासाठी लागणारे पाणी ही सोबत घेऊन गेले.सदर वासरु हे सुमारे ३० फूट खोल असलेल्या कोरड्या विहिरीत पडले होते. रात्रीचा अंधार आणी ३० फूट खोल कोरडी विहीर असे असताना देखील, त्या नवजात



वासराला वाचवीण्यासाठी कुमार ठाकूर हा जिगरबाज तरुण कंबरेला दोर बांधून त्या विहिरीत उतरला.

या वासराला योग्य प्रकारे दोरीने बांधून विहिरीच्या काठावर आसलेल्या आपल्या मित्रांच्या सहाय्याने त्या जिगरबाज तरुणांनी नवजात वासरास सुरक्षीतरित्या बाहेर काढून त्याचा जिव वाचविला आहे. सदर मोहिमेत कुमार ठाकूरच्या सोबत नरेंद्र ठाकूर, प्रशांत ठाकूर, अलंकार ठाकूर, तेजस ठाकूर, केतन ठाकूर, आशिष भालेकर, सूरज ठाकूर व अनुज ठाकूर यांनी देखील नवजात वासरास जीवदान मोलाची मदत केली.

## देवकान्हे येथे १५ वर्षे वयोगटातील मुलांचे लसिकरण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील देवकान्हे १५ वर्षे वयोगटातील मुलांना कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचा दुसरा डोस देऊन लसिकरणाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आला.

येथील सरपंच तथा रायगड भूषण लोकशाहीर वसंत भोईर उपसरपंच सूरज कचरे,ग्रा.पं.सदस्य दयाराम भोईर,यांचे प्रयत्न व सहकार्यातून सदर लसिकरण मोहिम यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आली.

यावेळी श्रमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिपक जगताप, सहा.शिक्षक नरेंद्र माळी,महेंद्र जवरत, आरोग्य सेविका ,ए.एस.मखर,शिल्पा पाटील, एस.पी. चिंचाळकर,आशा सेविका वेदिका टेंबे,स्वाती ठाकूर,आदी उपस्थित होते.

## शिवसेना महिला आघाडीतर्फे महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना महिला आघाडीतर्फे पनवेल शहर शाखेत शहर संघटीका सौ. अर्चना कुळकर्णी यांच्या संकल्पनेतून महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिलांना घरबसल्या काम मिळवून देण्याची माहिती देण्यात आली.

यावेळी रायगड जिल्हा संघटिका सौ. रेखाताई ठाकरे, उपजिल्हा संघटिका सौ. कल्पनाताई पाटील, विधानसभा संघटिका सौ. रेवती ताई सपकाळ, तालुका संघटिका सौ. सुजाता ताई कदम, उपतालुका संघटिका सौ. टिया अरोरा, उप महानगर संघटिका सौ. संचिता राणे, पनवेल तालुका संघटिका सौ. प्रमिला कुरघोडे, उपतालुका संघटिका श्रीमती सुनंदा पाटील, विभाग संघटिका सौ. रेश्मा कुरूप, शाखा संघटिका यास्मिन मुजावर, उपशाखा संघटिका परवीन पोपेरा, नविन पनवेल शहर संघटिका सौ. अपूर्वा प्रभू, उपशहर संघटिका सौ सुगंधा शिंदे शिवसेना महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.



## कुपोषित बालकांना पोषण पोटलीचे वाटप

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्धारातूनआदिवासी बांधवांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून केलेल्या सप्तसूत्री कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी चा भाग म्हणून म्हणून सुधागड तहसील कार्यालयामार्फत यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजना सुधागड (ICDS) अंतर्गत जांभूळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील घोडपापड अंगणवाडी येथील कार्यक्रमात केले

अन्नदान संस्था ठाणे व एचडीएफसी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड पाली तालुक्यातील १५६ अंगणवाडी केंद्रांना ३६०१ अन्नदा पोषण पोटली ह्या सहा महिने ते सहा वर्ष आणि कुपोषित मुले बालकांना वाटप करण्यात आले. सदर उपक्रम गेले एक महिना चालू आहे आहाराचे व शिक्षणाचे महत्त्व या कार्यक्रमात समजाविण्य आले. आदिवासी बांधवांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी सतत प्रयत्न करू सुधागड–पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार प्रतिपादन या कार्यक्रमाच्या अनुषंगाने करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सुधागड तालुका तहसीलदार दिलीप रायण्णावार, अन्नदा संस्था प्रतिनिधी आदित्य सालेकर (प्रोजेक्ट ऑफिसर) पप्पू गुप्ता (असिस्टंट मॅनेजर) ICDS प्रकल्प अधिकारी रंजना मात्रे बीट सुपरवायझर म. भुरे, लखीमळे दीक्षित, व–हाड–जांभूळपाडा ग्रामपंचायत सरपंच श्रद्धा कानडे सामाजिक कार्यकर्ते अमेय गुरव, रवि पवार अंगणवाडी सेविका व मदतनीस आदी या कार्यक्रमात उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आले.


मा.सोनवणे साहेब

अ‍ॅड.सुनील एन. मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.२१४/२०२२

नि.नं.१०/ड

ने.ता.१८/०४/२०२२

१) श्री.शिरिष नारायण घरत
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : धंदा
२) सौ.प्रियंका विशाल म्हात्रे
लग्नापूर्वीचे नाव : कुमारी.प्रियंका शिरिष घरत
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : घरकाम
अर्जदार नं.१ व २ रा.ए–९०२, शेठ नारायण पार्क,
सेक्टर–३, बेलपाडा, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१०
३) सौ.भावना कुलदीप पाटील
लग्नापूर्वीचे नाव : कुमारी.भावना शिरिष घरत
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : घरकाम
४) सौ.योगिता जयदीप पाटील
लग्नापूर्वीचे नाव : कुमारी.योगिता शिरिष घरत
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : घरकाम
अर्जदार नं.३ व ४ रा.एच.ओ.सी.एम्प्लोय सोसायटी,
जुने पनवेल, प्लॉट नं.१०१/१, गार्डन हॉटेलच्या
जवळ, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं.२ ते ४ यांची आई कै.पुष्पा शिरिष घरत या दि.२४/०३/२०२१ रोजी अपोलो हॉस्पिटल इंटरप्रायझेस लिमिटेड, प्लॉट नं.१३, सेक्टर–२३, सीबीडी बेलापूर नवी मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये मयत झाले आहेत. कै.पुष्पा शिरिष घरत यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत या सिडकोच्या अधिकार क्षेत्रात आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन** (i)

**मौजे : खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील, बिल्डींग ओम हार्मोनी, प्लॉट नं.२६७, सेक्टर १०, खारघर**

**१) सदनिका क्रमांक सी–११०४, अकरावा मजला, सी–विंग, क्षेत्र ६४.४८ चौ.मी. कारपेट + ७.८९ चौ.मी. टेरेस, स्टील्ट पार्कींग नं.१२७, पहिला मजला, क्षेत्र १२.५० चौ.मी. २) सदनिका क्रमांक–सी–१३०१, तेरावा मजला, सी–विंग, क्षेत्र ६४.४८ चौ.मी.कारपेट + ७.८९ चौ.मी. टेरेस, स्टील्ट पार्कींग नं.१९, तळमजला, क्षेत्र १२.५० चौ.मी. ३) सदनिका क्रमांक–सी–१३०२, तेरावा मजला, सी–विंग, क्षेत्र ६४.४८ चौ.मी. कारपेट + ७.८९ चौ.मी.टेरेस, स्टील्ट पार्कींग नं.२०, तळमजला, क्षेत्र १२.५० चौ.मी.**

**मिळकतीचे वर्णन** (ii)

**मौजे : वाडा, ता.वाडा, जि.पालघर येथील व्यापारी गाळा नं.४, फेमराज कॉम्पलेक्स, अे–विंग, तळमजला, नगरपंचायत घर नंबर ६/७६९/४ क्षेत्रफळ २६० चौ.फूट**

**मिळकतीचे वर्णन** (iii)

**मौजे : मुळगांव, ता.खालापूर, जि.रायगड, खोपोली नगरपालिका हद्दीतील**

**(अ)**

**फ्लॅट नं.९०४, नववा मजला, अशियाना इन्फीनिटी बिल्डींग नं.०२, बि–विंग, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड**

**(ब)**

**फ्लॅट नं.९०५, नववा मजला, अशियाना इन्फीनिटी बिल्डींग नं.०२, बि–विंग, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदाार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२३/२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.पांडे सो. यांचे कोर्टात

अ‍ॅड.श्री.स्वप्नेश सं. घरत

अर्जदार तर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.२१४/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२८/०३/२०२२

शबाना आयाज शेख
पुर्वाश्रमीची शबाना अब्दुल रहीमान शेख
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर क्र.१९२, इमान हुसेन चौक, मस्जिद जवळ,
घोडबंदर रोड, कासार वडवली, जि.ठाणे अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार शबाना आयाज शेख पुर्वाश्रमीची शबाना अब्दुल रहीमान शेख हिचा जन्म दि.०६/०४/१९७८ रोजी मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला असून तिच्या जन्माची नोंद संबंधित ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल यांच्या कार्यालयामध्ये करण्याचे अनावधानाने राहून गेले होते.

त्याअर्थी अर्जदार हिच्या जन्माची नोंद होवून, तसा जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याकरिता पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हिच्या जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याबाबत केलेल्या अर्जास कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांचे वकीलांमार्फत त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मा.कोर्टात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांच्या अर्जावर पुरावा घेवून, अर्जदार हिस जन्माचा दाखला मिळण्याचे आदेश पारित करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२३ माहे फेब्रुवारी २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**



### जाहीर नोटीस

दावा क्रमांक १९/२०२१

ने.ता.०३/०३/२०२२

ज्याअर्थी जि.रायगड, ता.म्हसळा, मौजे : चिरगांव येथील
१) पांडू सोन्या घडशी (मयत) वारस
१.१) चंद्रकांत गोविंद घडशी
१.२) बयो सोनू मोरे
१.३) दिलीप धोंडू घडशी
१.४) देवजी धोंडू घडशी
१.५) सरस्वती गोविंद घडशी
१.६) वसुधा वसंत भेकरे
सर्व रा.चिरगांव, ता.म्हसळा, जि.रायगड अर्जदार (कुळ)

विरुद्ध

१) शहा सिद्धी महामुद खान सिद्धी महमदखान
२) फतिमा बेगम आदनजी जसदनवाला
३) मुमताज बेगम सलीम खान
४) कमरुजा बेगम सिद्धी महमदखान
५) महादू सोन्या घडशी
सर्व रा.चिरगांव, ता.म्हसळा, जि.रायगड सामनेवाला (जमीनमालक)

अर्जदार यांनी सामनेवाले यांचे विरुद्ध खालील नमूद केलेल्या मिळकतीबाबत या न्यायालयात दावा दाखल केलेला असून सदर दाव्याच्या सुनावणीचे काम सदर न्यायाधिकरणाकडे चालू आहे. सदर दाव्याचे अनुषंगाने सामनेवाला १) शहा सिद्धी महामुद खान सिद्धी महमदखान २) फतिमा बेगम आदनजी जसदनवाला ३) मुमताज बेगम सलीम खान ४) कमरुजा बेगम सिद्धी महमदखान ५) महादू सोन्या घडशी रा.चिरगांव, ता.म्हसळा, जि.रायगड यांनी अगर त्यांचे हक्क सांगणारे त्यांचे वालीवारस व इतर सर्वांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर दाव्याची सुनावणी या न्यायालयात दि.०३/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण म्हसळा येथे ठेवण्यात आली आहे. सबब संबंधितांनी या न्यायालयात हजर राहून त्यांचे लेखी म्हणणे सुनावणीचे वेळी मांडावे, अन्यथा सदर दाव्याचा निर्णय हा गुणवत्तेवर देण्यात येईल.

**अनुसूची**

| गांव | भूमापन क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चिरगांव | १३/६ | १.९३.००<br>पो.ख. ०.१९.००<br>एकूण २.१२.०० | १.१२ |

ठिकाण : म्हसळा
दिनांक : २२/०२/२०२२

**सही/– अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण म्हसळा**



मे.गोडसे साहेब यांचे कोर्ट

अ‍ॅड.सरिता रामधरणे–शहासने

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.२३७/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.१६/०४/२०२२

१) श्रीमती.प्रभावती कमलाकर कटकधोंड
उ.व.६२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.औंकार कमलाकर कटकधोंड
उ.व.२१ वर्षे, धंदा : शिक्षण
३) स्वाती कमलाकर कटकधोंड
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.६०२, सिद्धीविनायक को.ऑप.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.३, सेक्टर–१४, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (पश्चिम), ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.कमलाकर नरसिंह कटकधोंड हे दि.१४/०४/२०२१ रोजी शेलार हॉस्पिटल, खांदा कॉलनी येथे मयत झालेले आहेत. सदरहू मयत कै.कमलाकर नरसिंह कटकधोंड यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | **शॉप नं.२१, श्री साई श्रद्धा को.ऑप. हौसिंग सोसायटी लि., बिल्डींग नं.०२, प्लॉट नं.१२, सेक्टर–१७, तळमजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), ता.पनवेल, जि.रायगड** | **२६१ चौ.फूट (बिल्टअप) + ८६ चौ. फूट लॉफ्ट** |

वरील मिळकतीबाबत अर्जदार ह्यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशा कोणत्याही प्रकारची तक्रार, वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत मुदतीत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज दि.२४ माहे फेब्रुवारी सन २०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मेडीकल टेक्नॉलॉजिस्ट असोशिएशन ऑफ रायगडच्या वार्षिक परिषदेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

रायगड जिल्हयातील अनेक वर्षे प्रयोगशाळा तंत्रज्ञांची वैद्यकीय क्षेत्रासह सामाजीक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मेडीकल टेक्नॉलॉजिस्ट असोशिएशन ऑफ रायगडच्या सन २०२१/२२ च्या दोन दिवसीय वार्षीक परीषदेचे आयोजन २६/२७ फेब्रुवारी २०२२ रोजी हॉटेल भारत महाबळेश्वर येथे करण्यात आले आहे. या परिषदेची सुरवात २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजल्या पासून होणार आहे.

दोन दिवसीय परीषदेत डॉ.शामला लाहोटी कुलकर्णी, प्रोफेसर प्रकाश पांगम यांच्या मार्गदर्शन सह विविध विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. परिषदेत क्लिनीकल लॅबोरेटरी अंतर्गत विषयांवरील मार्गदर्शन विविध अधुनीक तंत्रज्ञान, अधुनीक उपकरण, याबाबत तज्ञांमार्फत सविस्तर माहीती देण्यात येणार आहे. परिषदेत माहीती व चर्चासत्रानंतर असोशिएशनची वार्षीक सभा होणार असुन विविध विषयांवर साधक बाधक चर्चा होणार आहे. सर्वसाधारण सभेत जेष्ठ सभासद तथा माजी अध्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. दोन दिवसीय परिषदेत ज्ञाना बरोबर मनोरंजनाचे आयोजन असल्याने सर्व सभासदांनी मोठ्या संख्येंने उपस्थित रहावे अशी विनंती असोशिएशनच्या अध्यक्ष चंद्रकांत पारखे यांनी केले आहे.

## मांदाटणे ग्रामपंचायतीमध्ये संत गाडगे बाबा जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

ग्रुप ग्राम पंचायत मांदाटणे आणि पी. एन. हायस्कूल पाष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने छ. शिवाजी महाराज जयंती आणि संत गाडगे बाबा जयंती साजरी करण्यात आली.

या निमित्ताने विविध नावीन्य पूर्ण उपक्रम राबविण्यात आले. मांदाटणे ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच पुरस्कारीत सरपंच चंद्रकांत पवार यांनी ग्रामपंचायत हद्दीत विविध उपक्रम राबून ग्रामपंचायतीस अनेक पुरस्कार मिळवून दिले आहेत. त्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन हा महत्वाचा उपक्रम राबविला आहे. त्यांच्या प्रभावी उपक्रम आणि शासनाच्या सर्व योजना तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोचविल्यामुळे शासनाने त्यांना आदर्श सरपंच म्हणून पुरस्कारीत केले आहे. जि. प. चे कृषी आणि पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय सभापती बबन मनवे यांनी या कार्यक्रमांस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपसरपंच शंकर गोरीवले, सदस्या नीता पवार, मीनाक्षी मनवे, प्रज्ञा दिवेकर, बिलाल शिकलगार, ग्रामसेवक प्रभू ठाकरे, ललित पाटिल, सर्व शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पालीत अवैध पार्किंगला उत ; वाहन चालक, प्रवाशी व भाविकांची गैरसोय

## सशुल्क वाहनतळ उभे केल्यास अवैध पार्कींगची समस्या मिटेल

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहराला अनेक समस्यांनी वेढा घातला आहे. वाढती लोकसंख्या, भाविक, नागरिक व पर्यटकांमूळे वाहने पार्किंगची समस्या गंभीर झालीय. अष्टविनायकापैकी बल्लाळेश्वराचे स्थान असलेल्या पालीत अवैध्य पार्किंगची समस्या बिकट बनली आहे. आणि या अवैध पार्किंगमुळे वाहतूक कोंडी वाढत आहे. त्यामुळे वाहनचालक, पादचारी व भाविकांची गैरसोय होत आहे. वर्षानुवर्षे सदर समस्या असताना प्रशासन मात्र यावर तोडगा काढण्यात अपयशी ठरले आहे. अशातच पाली नगरपंचायतीत शेकाप राष्ट्रवादी आघाडीची सत्ता प्रस्थापित झालेली असून पालीतील विविध समस्या नगराध्यक्ष व नगरसेवक कशापद्धतीने सोडवतात याकडे सार्‍यांचे लक्ष लागले आहे.

नगरपंचायतीच्या माध्यमातून अवैद्य पार्किंग व वाहतूक कोंडी सारख्या समस्या सुटणार का? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होतोय. पाली या बाजारपेठेत याठिकाणी सशुल्क वाहनतळ उभे केले तर पार्किंगची समस्या मार्गी लागणार आहे. पालीतील रस्ते अरुंद आहेत. त्यात पालीत ठिकठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या केलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांमुळे वाहतुक कोंडी होते. यामुळे वाहनचालक, पादचारी व भाविकांना देखिल येथून मार्ग काढतांना अडचण होवून प्रचंड गैरसोय होत आहे. या अवैध्य पार्किंग करणार्यांवर पोलीस किंवा नगरपंचायतीकडून फारशी कारवाई केली जात नाही.

येथील बाजरपेठ रस्ता, गांधी चौक रस्ता, दुय्यंम निबंधक कार्यालय, जुने एस.टि स्टॅंड, बल्लाळेश्वर मंदिराचा परिसर, मिनिडोअर स्टॅन्ड ते बस स्टॅंड रस्ता या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुचाकी वाहने अवैध्यरित्या पार्क केलेली असतात. नो पार्किंगचे फलक काही ठिकाणी बसविण्यात आले असले तरी तेथेच गाड्या पार्क केल्या जातात. बाजारात व विविध सरकारी कार्यालयात आलेले लोक रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी करतात. परिणामी येथून जाणार्‍या येणार्‍या वाहणांना व पादचार्यांना रस्त्यावरुन मार्ग काढतांना अडचणी येतात. अष्टविनायकाचे स्थान असलेल्या पालीत बल्लाळेश्वराच्या दर्शन घेण्यासाठी असंख्य भाविक येतात. सध्या दिवाळी सुट्यांमुळे तर भाविकांची पालीत खूप रेलचेल सुरु आहे. मात्र रस्त्याच्या दुतर्फा उभ्या केलेल्या वाहनांमुळे वाहतुक कोंडिला आमंत्रण मिळते आणि भाविकांची मोठी गैरसोय होत आहे.

शाळा महाविद्यालय सुटण्याच्या वेळी येथे वाहतुक कोंडी होते विद्यार्थांना चालतांना अडथळा होतो. तसेच अपघात होण्याचीही शक्यता आहे. काही वेळेस वाहतूक पोलिस येथील नाक्यावर व गर्दीच्या ठिकाणी तैनात असतात. तसेच बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक देखील मंदिराजवळ वाहतूक कोंडी सोडविण्याचा व अवैध पार्किंग रोखण्याचा प्रयत्न करतात मात्र त्यांचे प्रयत्न अपुरे पडतात. पालीत मोकळ्या जागांवर सशुल्क वाहनतळ उभे केल्यास बेकायदा पार्किंगचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागू शकतो असे सुजान व ज्येष्ठ नागरिक सांगत आहेत.

# खांब विभागात ऊन्हाळी भात लागवडीची कामे अंतिम टप्प्यात

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील खांब विभागात कालव्याच्या पाण्याच्या आधारावर पिकविलेल्या ऊन्हाळी हंगामात ील भात शेती लागवडीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेथ.



चालू उन्हाळी हंगामात भात शेतीसी पिकविण्यासाठी आवश्यक असणारे पाणी योग्य वेळेत न मिळाल्याने हंगामातील भात पेरणीची कामे काहीशी पुढे ढकळली त्यामुळे लागवडीची कामेही सुमारे १५ ते २० दिवस पुढे ढकळली आहेत.परिणामी पिकाची वाढ,योग्य प्रकारे पाणी नियोजन, खताचे नियोजन, वातावरणातील पोषक परिस्थिती आदी घटकांचे बाबतीत थोडीफार कमतरता जाणवली तरी भात पिके तयार व्हायला बराचसा उशिर होण्याची शक्यता असते. एकदा का कापणीचा हंगाम लांबला की,मोसमी पावसाचे आगमन काहीवेळा लवकर झाल्याचे अनेकदा शेतकरी वर्गाने अनुभवले आहे. त्यामुळे वाढती महागाई, बी-बियाणे यांचे वाढते दर तसेच वाढती मजूरी याचा कसलाही विचार न करता योग्य कालावधीत भात शेतीची ला-गवड होणे अपेक्षित असल्याने शेतकरी वर्ग आपापल्या शेतीतील कामेही लवकरात लवकर कशी उरकतील याकडे लक्ष देऊन राहिला आहे. सुमारे चार दशकापूर्वी कालप्रकल्प पाटबंधारे विभाग रायगड यांच्या वतीने रोहे तालुक्यातील डोलवहाल येथे धरण बांधून ऊन्हाळी हंगामात भातशेती पिकविण्यासाठी शेतीला पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली. या पाणी पुरवठ्यामुळे ऊन्हाळी हंगामात शेतीला मुबलक पाणी पुरवठा होऊ लागल्याने तालुक्यात ठिकठिकाणी कालव्याच्या पाण्याच्या आधारावर भातशेती पिकू लागली. ऊन्हाळी भात शेतीमुळे शेती व शेतकरी वर्गाचाही विकास झाल्याचे दिसून आले. सद्यस्थितीत काही भागात कडधान्ये पिके तर काही भागात ऊन्हाळी भातशेती असे दृश्य दृष्टीस पडत आहे.

# माहिती व जनसंपर्कच्या कोंकण विभागाचे समाज माध्यम विषयक प्रशिक्षण संपन्न

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**




कोंकण विभागातील वृत्त व समाजमाध्यम विषयक काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विभागीय माहिती कार्यालय कोंकण भवन येथे विविध समाजमाध्यमे सुलभतेने हाताळण्यासाठी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि कोकण भवन येथील अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते.

अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन कामातील गुणवत्ता वाढीसाठी तसेच समाजमाध्यमामधील नवीन तंत्रज्ञान आत्मसात होण्यासाठी आणि अधिकाधिक माहिती जनतेसाठी पोहचविण्यासाठी या नवनवीन माध्यमांच्या माहितीसाठी हे प्रशिक्षण महत्वाचे आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक दिपक कपूर यांनी विभागीय माहिती कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालयांनी समाजमाध्यमांवर सतत अग्रेसर असावे, असे आवाहन केले होते त्या आवाहनानूसार आज या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कोंकण विभागातील जनतेला महाराष्ट्र शासनाच्या योजना अधिकाधिक पोहचविण्यासाठी समाज माध्यमांचा प्रभावी उपयोग करावा असे आवाहन कोंकण विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी यावेळी केले. श्री लिलाई डिजीटल कम्युनिकेशन लि. यांच्या वतीने श्री.प्रणवकुमार भदाणे आणि श्री. प्रियन म्हस्कर यांनी शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी समाज माध्यमांचा सुलभतेने व दक्षतेने कसा वापर करावा या विषयावर प्रात्यक्षिकासह तांत्रिक मार्गदर्शन केले. संगणक आणि मोबाईलचा उपयोग करताना सुरक्षितता असणे कसे आवश्यक आहे. या सोबतच अधिकाधिक लोकांच्या समोर जातांना कोणती नवमाध्यमे उपयुक्त ठरतील. याबाबतही माहिती त्यांनी दिली. यावेळी उपस्थित अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्रत्यक्ष कामात येणाऱ्या अडचणीबाबत प्रश्नोत्तरे झाली. प्रात्यक्षीकासह झालेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमाला कोकण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणाच्या प्रारंभी माहिती सहाय्यक प्रविण डोंगरदिवे यांनी प्रास्ताविक केले.

# पाली भूतीवली लघु पाटबंधारे योजने करीता १७ कोटी रुपयांची तरतूद

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या विशेष प्रयत्नातून पाली भूतीवली लघु पाटबंधारे योजने करीता ९७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

अनेक वर्षा पासून रखडलेल्या प्रकल्पापैकी एक प्रकल्प म्हणजे कर्जत तालुक्यातील पाली भूतीवली धरण या धरणाचे काम झाले आहे, धरणामध्ये पाणी साठा आहे, मात्र कालव्याचे काम झाले नसल्याने येथील शेतक-यांना शेतीसाठी पाणी मिळत नाही.

कर्जत तालुक्यातील पाणी साठ्याच्या दृष्टीकोनातून पाली भूतीवली धरण हे खूप महत्व-ाचे धरण आहे. सदर धरण हे जवळपासच्या गावांसाठी व कर्जत तालुक्यासाठी महत्वाचे असून सदर योजनेची अनेक कामे प्रलंबित आहेत. या संदर्भात दि.२९ जानेवारी २०२१ रोजी आमदार महेंद्र थोरवे यांनी पाहणी दौरा आयोजित केला होता.

पाली भूतीवली धरणाच्या कालवे बांधणी करीता निधीची मागणी आमदार थोरवे यांनी केली होती, याच आधारावर महाराष्ट्र राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाअंतर्गत धरणाच्या अपूर्ण कामांकरिता ९७ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीच्या तरतुदी मुळे पाली भूतीवली धरणाची अपूर्ण कामे मार्गी लागणार असून या पाण्याचा फायदा शेतीसाठी, सिंचनासाठी व पिण्यासाठी होणार आहे.

# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबिर

**दै.रायगड नगरी । उरण**

लाईट ऑफ लाईफ संस्था एचडीएफसी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने पेण मधिल बालगंगा विद्यामंदिर चुनाभट्टी जीते व न्यू इंग्लिश स्कूल जोहे येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.सध्याची परिस्थिती पहाता विद्यार्थांना स्वतःचे परीक्षण करून निर्णय घेणे फार गरजेचे आहे. या शिबिरामध्ये नैसर्गिक कल, आवड, उपलब्ध पर्याय यांची सांगड घालूनच आपण आपला व्यवसाय आपले ध्येय निवडावे असे विद्यार्थांना मार्गदर्शनाद्वारे सांगण्यात आले.

तसेच आपल्या व्यावसायिक ध्येयाला अनुसरून १० वी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान शाखा त्यामधून पुढील माध्यामिक, उच्यामधिक शिक्षण त्यासोबत इतर व्यावसायिक अभ्यासक्रम, कोणत्याही कॉलेज अथवा इतर ठिकाणी प्रवेश घेण्यासाठी आवश्यक दाखले यांची यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. ८७ विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. शाळेचे मुख्याध्यापक तसेच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे प्रमुख श्री सांगळे सर व श्री. म्हात्रे सर यांनी लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या संस्थापिका श्रीमती विली डॉक्टर मॅडम यांचे आभार व्यक्त केले.

## मुरुड ग्रामीण रुग्णालय तोडफोडीनंतर प्रशासनाला जाग

# दोन सुरक्षा रक्षकांची केले तैनात ; कर्मचाऱ्यांना दिलासा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड ग्रामीण रुग्णालयात दि. ०७ फेब्रुवारी रोजी रात्री दहा वाजता दाखल झालेल्या मध्य धुंद अवस्थेतील मध्यरात्री ०२:३० वाजता मंगेश शंकर जगताप या रुग्णाने हातात लोखंडी रॉड घेऊन मोठ्याप्रमाणात तोडफोड केली होती. यामध्ये रुग्णालयाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. या झालेल्या प्रकरा नंतर प्रशासनाने दखल घेऊन तब्बल १५ दिवसांनंतर सुरक्षारक्षकांची नेमणूक केली आहे. त्यामुळे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



मुरुड ग्रामीण रुग्णालयात दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी मद्यधुंद अवस्थेतील रुग्ण रात्री दहा वाजता आला होता. त्याची अवस्था पहाता वैद्यकीय अधिकारी डॉ विजय हाडबे यांनी या रुग्णाला गरजेनुसार अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल करावे असे चिठ्ठी देत सांगितले. सदर रुग्ण हा अलिबाग येथे जाण्यासाठी तयार नव्हता, या रुग्णाने रात्री २:३० च्या सुमारास लोखंडी रॉड घेऊन रुग्णालयात मोठ्याप्रमाणात तोडफोड केली. या वेळी रुग्णालयात असलेल्या महिला कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून गेला होता. सुदैवाने कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारची दुखापत झाली नाही. जर त्यावेळी सुरक्षा रक्षक असते तर कदाचित इतका मोठा प्रकार घडलाच नसता. या झालेल्या प्रकारानंतर प्रशासन जागे झाले. व मुरुड ग्रामीण रुग्णालयात दोन सुरक्षा रक्षकांची नेमणूक २३ फेब्रुवारी रोजी केली आहे. एक दिवस पाली व दुसरा रात्र पाली करता नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

प्रो.जमा रु५०/-

अर्जदारातर्फे वकील
ॲड.प्रवीण दत्तू पाटील

## जाहीर नोटीस

एम.ए.नं.१७५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/०४/२०२२

कै.प्रभावती श्रीधर दळवी मयत तर्फे वारस
कै.प्रदीप श्रीधर दळवी मयत तर्फे वारस
१) श्रीमती.प्राची प्रदीप दळवी
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) प्रतिमेश प्रदीप दळवी
वय : ३० वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) प्रणय प्रदीप दळवी
वय : २४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.इंदिरा संकुल सोसायटी, फ्लॅट नंबर अे-१०४, नाडकर्णी हॉस्पिटलच्या बाजूला जुने पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, कै.प्रदीप श्रीधर दळवी हे दि.०३/१२/२०२१ रोजी हिरानंदानी फोर्टीज हॉस्पिटल वाशी नवी मुंबई, जिल्हा : ठाणे येथे झाले. तसेच कै.प्रभावती श्रीधर दळवी ह्या दि.१४/११/२०१९ रोजी इंदिरा संकुल सोसायटी, फ्लॅट नंबर अे-१०४, जुने पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाले.

कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पुढील वर्णन केलेली मिळकती आहेत. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकत क्र.**

**दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड या बँकेमध्ये ठेवण्यात खालील वर्णनाच्या मुदतीत ठेवी (Fixt Deposite)**

**(मिळकत क्र.१/१)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| मुदत ठेव पावती नं. | ३०५१३९७९९०८ |
| नाव | कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी |
| दिनांक | ०६/०९/२०१९ |
| मुदत | ०६/०९/२०१९ ते ०६/०९/२०२० (१ वर्ष) |
| रक्कम | रु.४,५०,७३२/- (अक्षरी चार लाख पन्नास हजार सातशे बत्तीस मात्र) |
| व्याज | दरसाल दर शेकडा ७.२ टक्के |

**(मिळकत क्र.१/२)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| मुदत ठेव पावती नं. | ३१०४९४०८६६१ |
| नाव | कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी |
| दिनांक | ०६/०९/२०१९ |
| मुदत | ०६/०९/२०१९ ते ०६/०९/२०२० (१ वर्ष) |
| रक्कम | रु.९८,२६२/- (अक्षरी अठ्यान्नव हजार दोनशे बासष्ट मात्र) |
| व्याज | दरसाल दर शेकडा ७.३ टक्के |

**(मिळकत क्र.१/३)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| मुदत ठेव पावती नं. | ३०५१३९९६१२९ |
| नाव | कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी |
| दिनांक | ११/११/२०१९ |
| मुदत | ११/११/२०१९ ते ११/११/२०२० (१ वर्ष) |
| रक्कम | रु.४,७१,१२४/- (अक्षरी चार लाख एक्काहत्तर हजार एकशे चोवीस मात्र) |
| व्याज | दरसाल दर शेकडा ७ टक्के |

**(मिळकत क्र.१/४)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| मुदत ठेव पावती नं. | ३१३२९४२७५७६ |
| नाव | कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी |
| दिनांक | ०६/०९/२०१९ |
| मुदत | ०६/०९/२०१९ ते ०६/०९/२०२० (१ वर्ष) |
| रक्कम | रु.१०,२१,४६०/- (अक्षरी दहा लाख एकवीस हजार चारशे साठ मात्र) |
| व्याज | दरसाल दर शेकडा ७.३ टक्के |

**(मिळकत क्र.१/५)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| मुदत ठेव पावती नं. | ३०४८७०२५८५७ |
| नाव | कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी |
| दिनांक | ०६/०९/२०१९ |
| मुदत | ०६/०९/२०१९ ते ०६/०९/२०२० (१ वर्ष) |
| रक्कम | रु.३५,६७४/- (अक्षरी पस्तीस हजार सहाशे चौऱ्यात्तर मात्र) |
| व्याज | दरसाल दर शेकडा ७.५ टक्के |

**(मिळकत क्र.१/६)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| मुदत ठेव पावती नं. | ३०३६६६०१५५९ |
| नाव | कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी |
| दिनांक | ०६/०९/२०१९ |
| मुदत | ०६/०९/२०१९ ते ०६/०९/२०२० (१ वर्ष) |
| रक्कम | रु.९७,४४९/- (अक्षरी सत्यान्नव हजार चारशे एकोणपन्नास मात्र) |
| व्याज | दरसाल दर शेकडा ७.३ टक्के |

**(मिळकत क्र.१/७)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| मुदत ठेव पावती नं. | ३५९९०१५१९४० |
| नाव | कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी |
| दिनांक | ०६/०९/२०१९ |
| मुदत | ०६/०९/२०१९ ते ०६/०९/२०२० (१ वर्ष) |
| रक्कम | रु.१,२८,९२९/- (अक्षरी एक लाख अठ्ठावीस हजार नवशे एकोणतीस मात्र) |
| व्याज | दरसाल दर शेकडा ६.८ टक्के |

**(मिळकत क्र.२)**

| | |
|---|---|
| बँकेचे नाव व शाखा (Bank Name & Branch) | दि स्टेट बँक ऑफ इंडिया पनवेल शाखा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड |
| बचत खाता नं. (Saving Account No.) | ११०३५२०२६९८ |

**(मिळकत क्र.३)**

१ कै.प्रदीप श्रीधर दळवी यांचे नावे असलेली होंडा (Honda) या कंपनीची मोटार सायकल ॲक्टीव्हा ३ जी (Active 3 G) MH 46 AT 1523, रंग-पांढरा (WHITE)
२ कै.प्रदीप श्रीधर दळवी यांचे नावे असलेली प्लेजर (Pleasure) या कंपनीची मोटार MH 06 AU 8333, रंग-लाल (Red)
३ कै.प्रदीप श्रीधर दळवी यांचे नावे असलेली वॉल्सवेगन या कंपनीची वेंन्टो (Vento) कार MH 46 N 1693, रंग-पांढरा (CANDY WHITE)

**मिळकत क्र.४**

कै.प्रदीप श्रीधर दळवी यांचे नावे मौजे : पनवेल, तााालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील इंदिरा संकुल सोसायटी, फ्लॅट नंबर अे-१०४, पहिला मजला, बांधीव क्षेत्रफळ ६७.८१ चौ.मी. व १२.९४ चौ.मी.टेरेस

**मिळकत क्र.५**

कै.प्रदीप श्रीधर दळवी यांचे नावे मौजे : मोर्बे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सर्व्हे नंबर २०७/३ क्षेत्र ०-४०-० हे.आर.पॉ. ही जमीन मिळकत आहे.

मयत कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै.प्रभावती श्रीधर दळवी यांच्या पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै.प्रदीप श्रीधर दळवी व कै. प्रभावती श्रीधर दळवी यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शकीत झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.२४/०२/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**